आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्याकाळी ७.०० वाजता

८ ऑक्टोबर २०२३ – रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिन सोहळ्यात नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण
- शासकीय रुग्णालयांमधल्या मृत्यूंबाबत श्वेतपत्रिका काढण्याची काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी
- चीनमध्ये हाँगझू इथल्या ऑलिम्पिक क्रीडा केंद्रात १९व्या आशियाई क्रीडास्पर्धांचा रंगतदार समारोप सोहळा सुरु

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज चेन्नईत सुरु असलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचं भारतापुढं विजयासाठी २०० धावांचं आव्हान /भारताची खराब सुरुवात

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिनाचा मुख्य सोहळा  आज उत्तर प्रदेशात प्रयागराजच्या बमरौली तळावर झाला. हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर. चौधरी यांनी यानिमित्त आयोजित संचलनाची पाहणी केली. संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आणि इतर मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

यावेळी एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण केलं. यावेळी जुना बोधचिन्हांकीत ध्वज सन्मानपूर्वक उतरवून हवाई दलप्रमुखांकडे सुपूर्द केला गेला. आता हा जुना बोधचिन्हांकीत ध्वज हवाईदलाच्या वस्तुसंग्रहालयात ठेवला जाणार आहे. यंदाची हवाई दलाची संकल्पना “हवाई ताकद -  सीमापार” अशी आहे.

मुंबईत यानिमित्तानं आयोजित केलेल्या समारंभाला राज्यपाल रमेश बैस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हवाई दल केवळ आकाशातून संरक्षण करत नाही तर देशाच्या कोणत्याही भागाला नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसला तर तात्काळ धावून जातं, असं एअर व्हाईस मार्शल रजत मोहन यांनी सांगितलं. हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापनदिनानिमीत्त राष्ट्रपती, प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्र्यांनी भारतीय हवाई दलाचे सर्व जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात गेल्या दोन दिवसात पुन्हा पंधरा रुग्णांचा मृत्यू झाला. ६ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत या अतिगंभीर रुग्णांचा मृत्यू झाला. त्यात ६ नवजात बालकं, २ बालकं, आणि ७ प्रौढांचा समावेश असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या कालावधीत १५४ नवीन रुग्ण दाखल झाले, तर ९७ रूग्ण उपचारानंतर बरे होऊन घरी गेले आहेत. सध्या ७३२ रुग्ण या रुग्णालयात दाखल आहेत.

<><><><><>

राज्याच्या आरोग्य व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला असून सामान्य माणसाच्या जीवाशी खेळ सुरु आहे. विविध शासकीय रुग्णालयांमध्ये मृत्यूचं तांडव झालं. त्याबाबतची सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी, यासाठी सरकारनं श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली केली आहे. त्यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे.

या मृत्यू प्रकरणाची जबाबदारी स्वीकारून संपूर्ण मंत्रिमंडळानं राजीनामा द्यायला हवा, असंही थोरातांनी म्हटलं आहे. वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्थेवर कायमस्वरूपी संचालक नाही, याबद्दलही त्यांनी टीका केली आहे.

**<><><><>**

टोलवाढी संदर्भात येत्या चार दिवसांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊ, त्यानंतरही सकारात्मक निर्णय झाला नाही तर आंदोलन करण्याचा इशारा मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. टोलदरवाढी विरोधात मनसेचे ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांचं मुलूंड टोलनाका इथं गेल्या चार दिवसांपासून उपोषण सुरू होतं. राज ठाकरे यांनी आज सकाळी उपोषण स्थळाला भेट देऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. त्यानंतर ते ठाणे इथं बातमीदारांशी बोलत होते. याबाबतची भूमिकाही लवकरच स्पष्ट करू असंही त्यांनी म्हटलं आहे.

आत्तापर्यंत मनसेनं केलेल्या आंदोलनांमुळेच ६७ टोल नाके बंद झाले आहेत, शिवसेना आणि भाजपानं आपापल्या जाहीरनाम्यांमधून टोल नाके बंद करायचं आश्वासन दिलं होतं, मात्र त्यांना प्रश्न विचारले जात नाहीत अशी टीका त्यांनी केली. रस्ते व्यवस्थित बांधले जात नसतील तर टोल का घेतला जातो, नागरिक इतर करांसोबत रस्ते करही भरतात, मात्र त्यांना चांगले रस्ते मिळत नाही अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड इथं दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी या न्यायालयाचं उद्घाटन झालं. सर्वोच्च न्यायालयातले न्यायमूर्ती भूषण गवई, राज्याचे विधी आणि न्याय मंत्री या नात्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत कार्यक्रमाला

उपस्थित होते. न्यायालयाच्या नवीन इमारतीचा कोनशिला समारंभ आणि भूमिपूजनही यावेळी झालं.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी वकिली सुरु केल्याला यंदा १०० वर्ष होत असून भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचा अमृतमहोत्सव येत्या दोन वर्षांत साजरा होणार आहे, असं न्यायमूर्ती गवई यांनी यावेळी सांगितलं. राज्यघटनेला अनुसरून समाजाच्या शेवटच्या नागरिकांपर्यंत सर्वांना अल्पावधीत आणि कमीत कमी खर्चात न्याय देण्याचं काम या न्यायालयातून घडावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री फडनवीस म्हणाले, की, सध्या प्रलंबित खटल्यांचं आव्हान सगळ्यात महत्त्वाचं आहे. सरकार आणि न्यायालय यांनी एकत्रितपणे काम केलं, तर ती प्रक्रिया गतिशील होऊ शकेल.'

मंडणगड तालुक्यात आंबडवे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ गावी त्यांचं यथोचित स्मारक उभारून येत्या दोन वर्षांत त्याचं लोकार्पण केलं जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली.

**<><><><><>**

इंडिया मेला'च्या निमित्ताने भारत आणि जपान या दोन्ही देशांमधील सौहार्द, मैत्रीभाव घट्ट होऊन दोन्ही देश एकत्रीतपणे प्रगतीची नवी शिखरे सर करतील, असा विश्वास राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे. जपान मधल्या कोबे शहरात भारत-जपान यांच्यातील कला आणि खाद्य संस्कृतीला चालना देण्यासाठी आयोजित 'इंडिया मेला' या कार्यक्रमाच्या उदघाटन समारंभात ते बोलत होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे जपानमध्ये सादरीकरण झाल्याचा सांस्कृतिक मंत्री म्हणून मनापासून आनंद असल्याचं मुनगंटीवार यांनी

सांगितलं. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना जपानाने साथ दिल्याचा उल्लेख मुनगंटीवार यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

चीनमध्ये हाँगझू इथल्या ऑलिम्पिक क्रीडा केंद्रात १९व्या आशियाई क्रीडास्पर्धांचा रंगतदार समारोप सोहळा सुरु आहे. या समारोप सोहळ्यात हॉकीपटू पी आर श्रीजेश यानं भारताचा ध्वज धारण करत, पथकाचं नेतृत्व केलं. यापुढची आशियायी स्पर्धा जपानमध्ये होणार आहे, या सोहळ्यात पहिल्या आशियायी क्रीडा स्पर्धेची ज्योत, ध्वज आणि आशियायी ऑलिम्पिक परिषदेचा ध्वज जपानला हस्तांतरीत केला गेला.

या स्पर्धेत भारतानं २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कांस्य पदकांसह १०७ पदकांची विक्रमी कमाई करत, पदक तालिकेत चौथं स्थान मिळवलं. पदकतालिकेत चीननं २०१ सुवर्ण, १११ रौप्य आणि ७१ कांस्य पदकांसह ३८३ पदकांची कमाई करत पहीलं स्थान पटकावलं, तर जपाननं ५२ सुवर्णपदाकांसह एकूण १८८ पदकं जिंकत दुसरं स्थान मिळवलं. कोरिया प्रजासत्ताकनं ४२ सुवर्णपदकांसह एकूण १९० पदकांची कमाई करत तिसरं स्थान पटकावलं.

ऑलिम्पिक्स, राष्ट्रकुल आणि आशियाई खेळ या तीन प्रमुख स्पर्धांपैकी कोणत्याही स्पर्धेत भारतानं केवळ दुसऱ्यांदाच १०० हून अधिक पदकं जिंकली आहेत.

आशियाई क्रीडा स्पर्धेत शंभरहून अधिक पदकं जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज चेन्नईत सुरु असलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतापुढं विजयासाठी २०० धावांचं आव्हान ठेवलं आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र भारताच्या गोलंदाजांनी उत्तम कामगिरी करत धावगती रोखल्यानं त्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही. स्टीव्हन स्मिथनं सर्वाधिक ४६, तर डेव्हीड वॉर्नरनं ४१ धावा केल्या. शेवटचे तीन चेंडू बाकी असताना १९९ धावांवर ऑस्ट्रेलियाचा डाव संपला.

भारतातर्फे रविंद्र जडेजानं ३, तर जसप्रित बुमराह आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

भारताचीही सुरुवात खराब झाली. कर्णधार रोहित शर्मा आणि इशान किशन या दोन्ही सलामीवीरांसह श्रेयस अय्यर खातं न खोलता तंबूत परतले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ७ षटकात ३ बाद २० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**